लवाद दावा क्र. ९१/२०२०
एकनाथ वि. लवाद व इतर २

## <u>निशाणी क्र. १९ खालील आदेश</u>
## **CNR Number:. MHLA010020342020**

१. प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. १ व २ यांनी त्यांचे विरुद्ध "प्रकरण एकतर्फा चालवण्याचा" झालेला हुकूम रद्द करुन त्यांची कैफियत फैलावर घ्यावी यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी त्याच अर्जावर त्याचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास हरकत घेतली आहे.

३. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले.

४. सदर प्रकरणामध्ये सामनेवाला क्र. १ व २ यांचे कथन की त्यांना सदर प्रकरणामध्ये हजर होऊन त्यांचा बचाव करणे आवश्यक वाटत आहे. त्यासाठी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश बाजूला सारुन त्यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यांना अशी संधी न दिल्यास त्यांच्यावर नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी येऊ शकते.

५. योग्य न्याय होण्याच्या दृष्टीकोनातून अर्जदार व सामनेवाला यांना त्यांचे लेखी म्हणणे मांडण्याची व त्यानुसार पुरावा देण्याची योग्य ती संधी समान पद्धतीने देणे आवश्यक असते. या न्यायाने आता सामनेवाला क्र. १ व २ यांना अशी संधी देणे गरजेचे आहे. सामनेवाला क्र.१ व २ यांनी या अर्जासोबत त्यांची कैफियत

या प्रकरणामध्ये दाखल केली आहे.

६. वर नमूद परिस्थितीचा विचार करता सामनेवाला क्र. १ व २ यांना सदर प्रकरणामध्ये त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. सामनेवाला क्र. १ व २ यांचा अर्ज निशाणी १९ मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ व २ यांचे विरुद्ध दि. १८.०४.२०२२ रोजी "एकतर्फा प्रकरण चालवण्याचा" झालेला हुकुम रद्द करण्यात येत आहे.

३. सामनेवाला क्र. १ व २ यांना सदर प्रकरणामध्ये हजर होण्याची संधी देण्यात येते.

४. सामनेवाला क्र. १ व २ यांनी दाखल केलेली कैफियत फैलावर घेण्यात येत आहे व त्यास निशाणी क्र. २० देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

दि.: २३/०८/२०२२

(श्रीमती सुरेखा कोसमकर)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर.